वर्ष १० वे विषेश अंक R.N.I.N.MAHMAR/2013/51443-L/175/RNP/Beed/2022-24 संपादक-अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार-मंगळवार दि. १८ फेब्रुवारी २०२५ पाने ४ किंमत ३

## संतोष देशमुख प्रकरणात मोठा गौप्यस्फोट

# अनैतिक संबंधातून हत्येचा बनाव, प्री प्लॅनसह एक महिलाही केली तयार

केज, (दिव्य न्युज):- केज तालुक्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख, यांच्या हत्येला दोन महिने उलटून गेले, पण अद्याप ठोस कारवाई झालेली नाही. अशातच, राष्ट्रवादी काँग्रेस(शप)च्या खासदार सुप्रिया सुळे यांनी आज देशमुख कुटुंबाची भेट घेतली. यावेळी त्यांच्यासमोर मस्साजोगच्या ग्रामस्थांनी खळबळजनक दावा केला आहे. महिलेसोबत अवैध संबंधातून संतोष देशमुखांची हत्या झाल्याचा बनाव पोलिसांनी रचला होता. यासाठी एक महिलाही तयार ठेवली होती. पण, गावातील तरुणांनी अँब्युलन्सचा पाठलाग केला आणि डाव उलथून लावला, असा खळबळजनक दावा ग्रामस्थांनी केला आहे.

मयत संतोष देशमुखांचे बंधू धनंजय देशमुख, यांनीदेखील या आरोपाला दुजोरा दिला आहे. संतोष देशमुख हत्या प्रकरणाला वेगळे वळण देण्याचा कट खुद्द बीड पोलिसांनीच रचला होता, संतोष देशमुखांची हत्या ही अनैतिक संबंधातून झाल्याचे दाखवण्याचा प्रयत्न होता. त्यासाठी कळंबमध्ये एक बाईही तयार ठेवण्यात आली, पण गावकऱ्यांच्या जागरुकतेमुळे पोलिसांचा हा कट उधळून लावण्यात आला, असा आरोप धनंजय देशमुख यांनी केला.

▶▶ पान २ वर



Email:- dailydivyawarta@Gmail.com
दिव्य वार्ता
Email:-editordivyawarta@gmail.com

### म्हणून तो प्लॅन फसला

संतोष देशमुख यांचा मृतदेह केजऐवजी कळबंकडे वळवण्यात आला होता, असा दावा केला जात आहे. यावर धनंजय देशमुख यांनी प्रतिक्रिया दिली. अधिवेशनात सुरेश धस यांनी हा मुद्दा मांडला. त्यावेळेस त्यांनी ही माहिती सांगितली होती. पोलिसांनी भावाला जिथून घेतलं होतं, ती गाडी चिंचोलीला आली. चिंचोली फाट्याजवळ एक रस्ता केजकडे येतो आणि एक रस्ता कळंबकडे जातो. कळंबच्या दिशेने ती गाडी वळून जात होती. पण गावातल्या एक - दोन गाड्या पोलीसच्या पाठीमागे होत्या, हे पोलीसच्या लक्षात आल्यानंतर त्यावेळेस गाडीचा टर्न घेऊन त्यांना केजच्या रुग्णालयात घेऊन आले, असे धनंजय देशमुख म्हणाले.

### कोण पोलीस होते ते समजू शकलं नाही

या गुन्हेगारी टोळीचा जो मुख्य आहे त्यांचा प्लॅन असा होता की, एका सरपंचाची हत्या झाली आहे. त्याला एका महिलेकडे घेऊन जायचं. अगोदर त्यांचा प्लॅन होता तसा, मृत्यू झाल्यानंतर सुद्धा यांनी सोडलं नाही. हे त्या महिलेकडे जाऊन त्या ठिकाणी सोडणार होते. छेडछाड झाली, त्या ठिकाणी कपडे फाडून घेतले असते, अंगाला जखम करून घेतल्या असत्या आणि या माणसाने असं केलं म्हणून या माणसाला समाजातून उठवलं असतं. आज निषेध व्यक्त केले असते सगळ्यांनी, अशी घटना घडली चांगल्या माणसाकडून असा त्यांचा प्लॅन होता. कट करणारा मुख्य होता. कट कारस्थानात सहभागी असणारी पोलीसची गाडी होती, त्यात कोण पोलीस होते ते समजू शकलं नाही, असेही धनंजय देशमुख म्हणाले.

# 'स्थानिक स्वराज्य' अनिश्चित

## इच्छुकांना धाकधूक

मुंबई , (दिव्य न्युज ):- भाजप महाराष्ट्रात, केंद्रात सत्तेत असल्याने कार्यकर्त्यांना या अनुकूल वातावरणात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका व्हाव्यात, असे वाटते. पण न्यायालयात निकाल लवकर लागत नाही. पुढची सुनावणी २५ फेब्रुवारी रोजी होणार आहे. या दिवशी न्यायालय अंतिम निकाल देऊन निवडणुकीचा मार्ग मोकळा करणार का? असा प्रश्न आहे. त्यातच प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळेंनी एप्रिलमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होतील, असे जाहीर करून टाकल्याने इच्छुकांची धाकधूक वाढली आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांतील 'ओबीसी' आरक्षण, नगरसेवक संख्येवरून न्यायालयात अनेक याचिका दाखल झालेल्या आहेत. या सर्व याचिकांना एकत्र करून सर्वोच्च न्यायालयात सुनावणी सुरू आहे. जवळपास दीड वर्षापासून या याचिका प्रलंबित आहेत. विधानसभा निवडणुकीनंतर न्यायालयीन प्रक्रिया लवकर संपून निकाल जाहीर होतील अन् निवडणूक प्रक्रिया सुरू होईल, अशी चर्चा भाजप कार्यकर्त्यांत सुरू होती. यासाठी २२ जानेवारीची न्यायालयातील सुनावणी खूप महत्त्वाची मानली जात होती. या सुनावणीत काय होणार याकडे कार्यकर्त्यांचे होते. पण २२ जानेवारी रोजी सुनावणीची पुढील तारीख २८ जानेवारी, त्यानंतर आता ही सुनावणी २५ फेब्रुवारी रोजी होणार आहे. न्यायालयाने जवळपास एका महिन्याने सुनावणी ठेवली.

दोन वर्षांनी निवडणुका?

निवडणूक आयोगाकडून निवडणूक अध्यादेश, प्रारूप प्रभाग रचना करणे, त्यावर हरकती-सूचना मागविणे, सुनावणी घेऊन प्रभाग अंतिम करणे, मतदारयाद्यांची फोड करणे, मतदारयाद्या अंतिम करणे अन् यानंतर आचारसंहिता लागू करून निवडणूक प्रक्रिया राबविणे ही निवडणुकीची मोठी प्रक्रिया आहे. असे असताना एक-एक महिना न्यायालयातील सुनावणी पुढे जात असेल तर एप्रिल-मेमध्ये निवडणुका कशा होतील? असा प्रश्न कार्यकर्त्यांना पडला आहे. त्यामुळे आता महापालिका, जिल्हा परिषद, पंचायत समित्यांच्या निवडणुका या दिवाळीनंतरच होतील. त्यातच केंद्र सरकारने जनगणना सुरू करून नव्या लोकसंख्येनुसार निवडणूक घेण्याचे स्पष्ट केले तर खूप मोठी उलथापालथ होणार आहे.

सदस्यसंख्येपासून प्रभागात मोठे

▶▶ पान २ वर

# पुण्यात चिकनमुळे जीबीएसचा उद्रेक?

### एनआयवीच्या तपासणीत खरं कारण आलं समोर

मुंबई, (दिव्य न्युज ):- पुण्यात जीबीएसने थैमान घातले आहे. कारण पुण्यात जीबीएस बाधित रुग्णांची आणि मृतांची संख्या वाढत चालली आहे. सुरुवातीला हा आजार दुषित पाण्यामुळे होत असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला होता. मात्र तपासणीनंतर पाण्यामुळे हा संसर्ग होत नसल्याचे समोर आले होते. त्यानंतर रविवारी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी कोबड्यांच मांस खाल्ल्याने जीबीएसचा आजार होत असल्याचा दावा केला होता. अजित पवार यांच्या या दाव्यानंतर अन्न व औषध विभागाने सिंहगड रोडवरील कोबड्यांच्या मासांची तपासणी केली. या तपासणीत कोंबड्याच्या मांसामध्येही बॅक्टेरीया आढळला नाही आहे. त्यामुळे आता कोंबड्यांच्या मांसामुळे देखील जीबीएस होत नसल्याचे स्पष्ट होत आहे.

खरं तर गेल्या रविवारी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पुण्यात ऋइड हा आजार पाण्यामुळे नाही, तर कोंबड्याचं मांस खाल्याने होत असल्यादा दावा केला होता. त्यामुळे कोंबड्यांचे मांस घेतल्यानंतर ते पूर्णपणे शिजवूनच खा, असा सल्ला त्यांनी पुणेकरांना दिला होता. अजित

▶▶ पान २ वर




# ग्रामपंचायत सदस्यांचा मासिक सभेला बहिष्कार

### बदली झालेल्या ग्रामसेवकाला पुन्हा नियुक्त करण्याची मागणी

नेकनूर, (दिव्य न्युज):- येथील ग्रामपंचायतमध्ये सध्या ग्रामसेवकांच्या बदलीच्या मुद्द्यावरून मोठे राजकीय वादंग निर्माण झाले आहे. काही दिवसांपूर्वी कार्यरत असलेले ग्रामसेवक एस. बी. वाघमारे यांची अचानक बदली करण्यात आली, आणि त्यांच्या जागी राहुल वीर यांची नियुक्ती करण्यात आली. मात्र, ग्रामपंचायत सदस्यांनी वाघमारे यांच्यावर विश्वास व्यक्त करत, त्यांनाच पुन्हा नियुक्त करण्याची मागणी केली आहे.

ग्रामसेवक बदलल्याने नाराज असलेल्या ग्रामपंचायत सदस्यांनी आज आयोजित मासिक सभेला पाठ फिरवली. एकूण १७ सदस्यांपैकी केवळ ५ सदस्यच उपस्थित राहिले, तर उर्वरित सदस्यांनी बैठकीवर बहिष्कार टाकला. यामुळे ग्रामपंचायतीच्या निर्णय प्रक्रियेत अडथळा निर्माण झाला असून, यावरून गावभर चर्चा सुरू आहे.

नेकनूर ग्रामपंचायतीतील बहुतांश सदस्य आणि स्थानिक नागरिक वाघमारे यांच्या कामावर समाधानी होते. त्यांनी विकासकामे, शासकीय योजना आणि गावातील प्रशासन चांगल्या पद्धतीने हाताळल्याने त्यांना पुन्हा रुजू करून घेण्याची मागणी करण्यात येत आहे.दुसरीकडे, ग्रामपंचायतीतील काही सदस्य आणि अधिकारी यास राजकीय हेतूने प्रेरित आंदोलन मानत आहेत. ग्रामसेवक बदल हा प्रशासकीय निर्णय असल्याने, त्यात राजकीय हस्तक्षेप होऊ नये, असे काही सदस्यांचे म्हणणे आहे.ग्रामसेवक बदली प्रकरणावर लवकरच वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक होणार असल्याचे समजते. ग्रामपंचायत सदस्यांचा विरोध लक्षात घेता, स्थानिक प्रशासन कोणता निर्णय घेणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.



# तरुणांच्या दोस्ती यारीतला दिलखुलास राजा माणूस,सोहेल भाऊ कुरेशी

**बीड । दिव्य न्युज**

काही व्यक्ती आपले जिवन जगत असतांना आपल्या कार्योतुन आणी दिलखुलास जगण्यातून समाजाच्या हृदयातील ताईत बनत असतात. समाजाप्रतीची तळमळ, धडपड, आणी काहीतरी करुन दाखवण्याची मणात असणारी उर्मी ही अशा लोकांना स्वस्थ बसु देत नसते, मोजक्या लोकांना सामाजिक भान आणी समाजातील दु:खीत ,वंचित, यांचे दु:ख बघुन आपला जन्म या लोकांच्या दु:खावर फुंकर घालण्यासाठीच झालेला आहे हि खुणगाठ मणात बांधुन ते अहोरात्र या कार्यासाठी तयार असतात. सामाजिक भाना बरोबरच आपल्या सोबत्याचे संघटन करुन आणी एका विचाराने प्रेरीत होऊन कार्य करणारे व्यक्ती तसे पाहता थोडकेच बघायला मिळतात. असेच एक व्यक्तीमत्व बीड शहरात आहे ते म्हणजेच सोहेल भाऊ कुरेशी, सोहेल भाऊ कुरेशी नाव उच्चारले कि आपसुकच बीड जिल्ह्यातील नागरिकांच्या तोंडी नाव येते ते जावेद भैय्या कुरेशी यांचे.एकता सामाजिक ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष जावेद भैय्या कुरेशी यांचे सोहेल भाऊ कुरेशी हे पुतणे. आपल्या काकांच्या एकता ग्रुपच्या माध्यमातून उभ्या महाराष्ट्रात समाजकारणाची चळवळ ,आणी समाजकार्य करण्यात जावेद भैय्या कुरेशींच्या या पुतणे असणार्या सोहेल भाऊ कुरेशींचा सिंहाचा वाटा आहे असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही. कारण एकता ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष जावेद भैय्या कुरेशी हे जरी असले तरीही हा ग्रुप चालवण्यात, बीड जिल्ह्यातील घराघरात पोहचवण्यात आणी या एकता ग्रुपचे संघटन करुन तरुणांची फौज उभी करण्यात सोहेल भाऊचा सिंहाचा वाटा आहे. आपल्या काकांच्या पावलावर पाऊल टाकत समाजाप्रती आपलं काही देणे लागते,व दु:खीत ,शोषित ,वंचितांची पाठराखण करुन त्यांना मायेचा आधार देण्याचे महान कार्य सोहेल भाऊ कुरेशी यांचे सुरुच आहे. समाजकार्यासाठी आवश्यक असते तरुणांची आणी कार्यकर्त्यांची फौज, एकता ग्रुप मध्ये अशा धडाडीच्या



कार्यकर्त्यांची फौज निर्माण करण्याचे काम,आणी आपले काका जावेद भैय्या कुरेशी यांच्या पाठिशी तरुणांचा सहभाग जमवण्यात सोहेल भाऊ कुरेशी अग्रेसर आहेत, तरुणांच्या दोस्ती यारीतला दिलखुलास माणूस म्हणुन सोहेल भाऊ कुरेशी यांच्या कडे पाहीले जाते . अशा या दिलखुलास भाऊंचा वाढदीवस १८ फेब्रुवारी रोजी साजरा होतो आहे, सोहेल भाऊ कुरेशी यांच्या वाढदीवसा निमित्त त्यांना दिर्घायुष्य लाभो आणी त्याच्या हातून समाजकार्या बरोबरच गोरगरीब दिन दलीत यांची सेवा घडो हिच वाढदीवसाची मनोकामना

---

पान ४ वरून

## सत्तेची,पैशांची मस्ती

त्या तानाजी सावंतचं पोरगं सापडतं, पण संतोष देशमुखांचा खुनी सापडत नाही? तो गरीब, शोषित, पीडित आहे म्हणून आवाज नाही का त्याला? जोपर्यंत त्याला न्याय मिळत नाही, दोन्ही मुलांची जबाबदारी पवारांनी घेतली आहे, असंही सुप्रिया सुळे म्हणाल्या.यावेळी गावकऱ्यांनी बीडमधील आणि आजूबाजूच्या गावातील दहशतीबाबत माहिती सुप्रिया सुळेंना दिली. पोलिसांनी कशाप्रकारे हयगय करून हे प्रकरण दाबण्याचा प्रयत्न केला, याची माहितीही दिली. आजूबाजूच्या गावातील इतर गुन्ह्यांविषयीही गावकऱ्यांनी सांगितलं. एकूणच बीडमधील सामाजिक आणि राजकीय परिस्थिती चिघळल्याची अनेक उदाहरणं गावकऱ्यांनी सुप्रिया सुळेंना दिली असून या सर्व प्रकरणात महिला म्हणून गावकऱ्यांच्या पाठिशी असल्याचं त्या म्हणाल्या. तसंच, या प्रकरणात देवेंद्र फडणवीसांकडून फार अपेक्षा होत्या. त्यांच्या भेटीची वेळ मागितली असून बजरंग सोनावणे आणि मी जाऊन त्यांची भेट घेणार आहोत, असंही सुप्रिया सुळे म्हणाल्या.

## कारंजा, खंदक व अजिजपुरा

करणार आपल्या कार्यालया समोर उपोषणास बसु व त्याचे होणारे सर्व परिणामांची जबाबदारी आपले कार्यालयाची राहील.

अशी मागणी सय्यद तालेब अली, मिर्झा रऊफ बेग, पटेल अब्रार अहेमद, शेख शमशोद्दीन, फेरोज पटेल, मेराज शेख, शकील अहेमद, मोहम्मद सलीम, इलियास टेलर (माजी सभापती) फैय्याज अली, परवेज मौलाना, छगन बाबुराव दळवी, मोहम्मद शेख, शेख सलीम, अतिक शेख, मोहसीन फुलारी, फारोक मेट्रो, मुजाहेद पटेल, खान एम.एच, काजी शमशुद्दीन व कारंजा, खंदक व अजिजपुरा भागातील समस्त नागरीक यांनी केली आहे.

## बैठकीपूर्वी कॅबिनेटचा

अशी अपेक्षा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केली. कल्याण डोंबिवली महापालिका परिसरातील घरांचा विषयावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मत व्यक्त केले. या ठिकाणी बोगस महारेरा प्रकरणातील साडेसहा हजार रहिवाशी बेघर होण्याची शक्यता आहे. याबाबत उच्च न्यायालयाने आदेश दिले. त्यानंतर महापालिकेने ४८ इमारतींमधील रहिवाशांना पुढच्या दहा दिवसात घरे खाली करण्याची नोटीस पाठवली आहे. त्यावर मुख्यमंत्री म्हणाले, कल्याण डोंबिवली संदर्भात मी स्वत: बैठक घेत आहे. या ठिकाणी गरजू लोकांची घरे कशी वाचवता येईल, त्याचा विचार केला जाणार आहे. त्यासाठी आम्ही सर्वोच्च न्यायालयात देखील जाऊ, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

---

पान १ वरून

## अनैतिक संबंधातून

असा आहे त्या दिवशीचा घटनाक्रम...

धनंजय देशमुखांनी त्या दिवशीचा सगळा घटनाक्रम सांगितला. ते म्हणाले की, संतोष आण्णांना दवाखान्यात न्यायचे आहे, असे एका सहकाऱ्याने फोनवर सांगितले. पण पोलिसांनी त्यावेळी काय घडले, याची माहिती कुणालाही लागू दिली नाही. संतोष देशमुखांना घेऊन जाणारी अँब्युलन्स अचानक कळंबच्या दिशने निघाली. केजमध्ये रुग्णालय आणि पोलिस स्टेशन असूनही कळंबच्या दिशेने अँब्युलन्स का नेली जात आहे, असा प्रश्न त्यावेळी तरुणांना पडला. संशय आल्यामुळे तरुणांनी त्या अँब्युलन्सचा पाठलाग केला आणि पोलिसांचा हा कट अयशस्वी ठरला.

कळंबमध्ये बाई तयार होती

सुरेश धसांनी हा मुद्दा सभागृहात मांडला होता. त्यावेळीही त्यांनी कळंबमध्ये एक महिलेला तयार ठेवण्यात आल्याचे आमि आणि हत्येला वेगळे वळण देण्याचा कट असल्याचा आरोप केला होता. माणसांना मारायचे, हातपाय मोडायचे, रक्तबंबाळ करायचे हे आरोपींचे काम. त्यांनी कळंबमध्ये एका महिलेले पैसे देऊन तयार ठेवले असायचे. मग छेडछाडीतून त्या व्यक्तीला मारण्यात आल्याचे चित्र निर्माण करायचे आणि त्यानंतर ती महिला विनयभंगाची केस करायची. असे प्रकार मोठ्या प्रमाणात व्हायचे. या प्रकरणात कुठे केस दाखल करुन घेतली जायची नाही. उलट समाजातून त्या व्यक्तीला उठण्याची वेळ यायची. समाजासाठी लढणाऱ्या होतकरू तरुणाला बदनाम करण्याचा पोलिसांचा आणि आरोपींचा कट होता, असा आरोपही धनंजय देशमुख आणि मस्साजोगच्या ग्रामस्थांनी केला.

आम्हालाही ही गोष्ट रात्री लगेच कळाली

महिलांनी आरोप करायचे आणि त्यातून हत्या झाली होती असं दाखवायचं होतं. पण नशीब त्यातील दोन गाड्या गाडीच्या पाठीमागे होत्या म्हणून हे त्यांना साध्य करता आलं नाही. आम्हालाही ही गोष्ट रात्री लगेच कळाली. अण्णाने इथली माहिती घेऊन सभागृहात मांडलं होतं. पहिल्या आठ दिवसाची पुन्हा चौकशी करुन याची आम्हाला माहिती घ्यायची आहे. पोलिसांनी सीआयडी आणि एसआयटीला काय माहिती दिली आहे, असा सवालही धनंजय देशमुख यांनी केला.

## ‘स्थानिक स्वराज्य’

बदल होतील. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका किमान आगामी दोन वर्षे होणार नाहीत. कदाचित २०२७ मध्येच निवडणुका होतील असाही अंदाज कार्यकर्ते, पदाधिकारी तसेच अधिकारी लावत आहेत. खरे तर आता कार्यकर्ते इतक्यात निवडणुका होणारच नसून, अजून काही महिने लागतील या निष्कर्षापर्यंत आले आहेत.

बावनकुळेंची भविष्यवाणी

मात्र, भाजप प्रदेशाध्यक्ष, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी नुकतेच पिंपरी-चिंचवडमध्ये निवडणुकीसंदर्भात एक भविष्यवाणी केली आणि पुन्हा कार्यकर्त्यांत चलबिचल सुरू झाली आहे. ‘‘आता खूप दिवस महापालिका नगरसेवकांविना राहू नये. लवकरच या निवडणुका होण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. लवकर निकाल देण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाला विनंती केली जाणार आहे. फेब्रुवारीत निकाल आला तर एप्रिलमध्ये निवडणुका होऊ शकतील. राज्य निवडणूक आयोगाने निवडणूक जाहीर करताना महाराष्ट्र शासन मनुष्यबळ उपलब्ध करून देईल. त्यामुळे कार्यकर्त्यांनी निवडणुकीसाठी सज्ज राहावे,’’ असे बावनकुळे यांनी थेट सांगितले आहे.

## पुण्यात चिकनमुळे

पवार यांच्या या दाव्यानंतर अन्न व औषध प्रशासन ॲक्शन मोडमध्ये आले होते.

सोमवारी अन्न व औषध प्रशासन विभागाने सिंहगड रोड परिसरातून ६० कच्च्या कोंबडीचे नमुने गोळा केले होते. त्यानंतर ते ठाण्यातील एनएबीएल-मान्यताप्राप्त सुविधा असलेल्या एन्व्हायरोकेअर लॅब्सकडे पाठवले होते. यावेळी केलेल्या चाचणीमध्ये चिकनच्या मांसामध्ये बॅक्टेरियाचे दूषित घटक, विशेषतः सी. जेजुनी नसल्याचे पुष्टी झाली आहे. एफडीएने हा निष्कर्ष पुणे विभागीय आयुक्त आणि पुणे महानगरपालिका (पीएमसी) यांना कळवला आहे.

दरम्यान अजित पवार यांनी यापूर्वी लोकांना कमी शिजवलेले चिकन खाणे टाळण्याचे आवाहन केले होते. कारण त्यांच्याशी ऋडच्या वाढत्या प्रकरणांचा संबंध आहे अशी चिंता होती.त्यानंतर त्यांनी स्पष्ट केले की पाणीपुरवठ्यातील दूषितता हा प्राथमिक संशय आहे.तसेच जीबीएसची परिस्थिती नियंत्रणात आहे. पूर्णपणे शिजवल्यानंतरच चिकन खावे, कारण कमी शिजवलेले मांस मानवांमध्ये संसर्ग निर्माण करू शकते,असेही अजित पवार म्हणाले होते.

आरोग्य अधिकाऱ्यांचे म्हणणे काय?

जेजुनीने दूषित पाणी किंवा अन्न सेवन केल्याने बॅक्टेरियाचा संसर्ग होऊ शकतो आणि क्वचित प्रसंगी जीबीएस, एक न्यूरोलॉजिकल डिसऑर्डर होऊ शकतो.पुण्यातील राष्ट्रीय विषाणू विज्ञान संस्थेला (एनआयव्ही) सध्या उपचार घेत असलेल्या जीबीएसच्या संशयित ३० रुग्णांच्या मलमूत्राच्या नमुन्यांमध्ये सी. जेजुनीचे अंश आढळले. मांस अयोग्यरित्या शिजवल्याने बॅक्टेरिया तसेच राहू शकतात आणि संसर्गाचा धोका वाढू शकतो, असा इशारा तज्ज्ञांनी दिला आहे.


